| नजीकच्या काळातील पासपोर्ट फोटो |
|---|

**प्रति,**
मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, .............

**विषय :- "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांचे नामतालिकासाठी अर्ज सादर करणेबाबत ...**

**महोदय,**

मी सहकार खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी, इतर शासकीय विभागातील / स्थानिक स्वराज्य संस्थेतील सेवानिवृत्त/ कार्यरत अधिकारी / कर्मचारी, वकील / प्रमाणीत लेखापरीक्षक / सहकारी संस्थेतील कार्यरत / सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी असून आपणांस याव्दारे विनंती करतो / करते की, आपल्या जिल्हयातील "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका **(२५० किंवा त्यापेक्षा कमी सभासद असणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून)** घेण्याची कार्यवाही पार पाडण्याकरीता निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका तयार करण्याबाबतची जाहिरात प्राधिकरणाने प्रसिध्द केलेली आहे,

त्यास अनुसरून मी सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी म्हणून कामकाज करण्यास इच्छुक असून मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारित तरतूदी ज्ञात आहेत.

**माझी वैयक्तिक माहिती खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र | विषय | तपशिल |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | संपूर्ण नाव :- मराठी<br>इंग्रजी | |
| २ | संपूर्ण पत्ता :- निवास<br>कार्यालय | |
| ३ | जन्म दिनांक - | |
| ४ | शैक्षणिक अर्हता / पात्रता - | |
| ५ | दुरध्वनी / मोबाईल नंबर - | |
| ६ | ई-मेल आय डी - | |
| ७ | निवृत्त असल्यास -<br>१. संस्थेचे / कार्यालयाचे नाव<br>२. निवृत्तीचे वेळी धारण केलेले पद<br>३. सेवा निवृत्तीचा दिनांक | |
| ८ | वकील असल्यास बार कौन्सिलचे छायांकीत व स्वसाक्षांकीत प्रमाणपत्र - | |
| ९ | प्रमाणीत लेखापरीक्षक असल्यास पॅनल नंबर - | |
| १० | सहकारी संस्थेतील (उदा. अर्बन बॅक फेडरेशन, पतसंस्था फेडरेशन, कारखाना महासंघ इ.) कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता<br>संस्थेचे नाव :-<br>पद :-<br>नेमणुक दिनांक :- | |

| | | |
|---|---|---|
| ११ | अनुभव असल्यास अनुभवाच्या दाखल्याची मूळ प्रत जोडण्यात यावी. | |
| १२ | आधार कार्ड क्रमांक - | |

मी वरील प्रमाणे सादर केलेली सर्व माहिती सत्य असून याबाबतचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे. निवडीचे कोणत्याही टप्प्यावर मी सादर केलेली माहिती चुकीची किंवा खोटी किंवा बनावट असल्याचे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे निदर्शनास आल्यास त्याबाबत माझे विरूध्द वैधानिक कारवाई होऊ शकते याची मला जाणीव आहे. तरी माझ्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून मला सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी म्हणून नामतालिकेत माझे नांव समाविष्ट करण्यात यावे ही विंनती.

**आपला / आपली विश्वासू**

**( नाव व सही )**

# प्रतिज्ञापत्र

**(रु. १००/- स्टॅम्प पेपर व नोटरी करणे आवश्यक)**

मी, श्री/श्रीमती/सौ.-------------------------------------------------------------------वय ----------वर्षे राहणार
---------------------------------------------------------------------------------- सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो / देते की, मी सहकार खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी, इतर शासकीय विभागातील/ स्थानिक स्वराज्य संस्थेतील कार्यरत / सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी, वकील / प्रमाणीत लेखापरीक्षक / सहकारी संस्थेतील कार्यरत / सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी असून आपणांस याव्दारे विंनती करतो / करते की, आपल्या जिल्हयातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्याची कार्यवाही वेळोवेळी पार पाडण्यात येते. मी सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी म्हणून कामकाज करण्यास इच्छुक असून मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, त्याखालील नियम १९६१, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारित तरतूदी ज्ञात आहेत. मी प्राधिकरण स्थापनेनंतर सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी म्हणून कामकाज पुर्ण केलेले / पाहिलेले आहे. (असल्यास सोबतच्या नमुन्यातील स्वत्रंत यादी सादर करावी)

मी, असेही प्रतिज्ञेवर लिहुन देतो / देते की, सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे कामकाज करतांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, त्याखालील नियम १९६१, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारित तरतूदी नुसार निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी म्हणून कामकाज करीन व सदरचे कामकाज करतांना कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार, भेदभाव, कायदा, नियम किंवा निवडणूक नियमावलीचे उल्लघंन करणार नाही. माझ्याकडून सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे कामकाज करतांना कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार, भेदभाव, संस्थेचे आर्थिक नुकसान किंवा कायदा, नियम, तसेच निवडणूक नियमावलीचे उल्लंघन झाल्यास त्यास मी सर्वस्वी जबाबदार राहीन व मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, यापूर्वी सहकारी संस्थांची निवडणूक घेत असतानां कोणत्याही नियमाचे उल्लघंन माझ्याकडून झालेले नसून त्याबाबत माझेवर कोणतीही वैधानीक कारवाई करण्यात आलेली नसून मला यापूर्वीच्या तालिकेवरून कमी केलेले नाही.

**सही /-**

**(नाव : -------------------------------)**

**दिनांक :-**

**ठिकाण :-**

## विहित नमुना

## प्राधिकरणामार्फत घेतलेल्या निवडणूकाची माहिती असल्यास

| अ.क्र | संस्थेचे नाव व पत्ता | संस्थेचे वर्गीकरण | निवडणूक घेतलेला दिनांक | संचालक मंडळाचा निवडणूक कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |

**सही /-**

**(नाव : ------------------------------)**

**दिनांक :-**

**ठिकाण :-**

## “क” व “ड” वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांचे नामतालिकासाठी अर्ज सादर करणेबाबत कार्यक्रम

| अ.क्र. | विषय | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | जाहिरात प्रसिध्द करणे | २१.०७.२०२० | वर्तमन पत्र व मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे www.shakarayukta.gov.in किंवा https://sahakarayukta.maharashtra.gov.in या वेबप्रणालीवर |
| २ | विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे सादर करणे ( प्रत्यक्ष अथवा कोव्हिड १९ मुळे संबंधितांच्या ई-मेलवर ) | २२.०७.२०२० ते ०५.०८.२०२० | सर्व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय / ई-मेल |
| ३ | प्राप्त अर्जाची छानणी करणे | ०६.०८.२०२० ते ०७.०८.२०२० | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय |
| ४ | पात्र निवडणूक निर्णय अधिकारी /प्राधिकृत अधिकारी यांचे नामतालिका यादी बनविणे | १०.०८.२०२० ते ११.०८.२०२० | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय |
| ५ | प्राधिकरणाकडे यादी सादर करणे | १२.०८.२०२० | राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे |

१५/७/२०२०

(यशवंत गिरी)

**सचिव**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,

महाराष्ट्र राज्य, पुणे